महाराष्ट्राचे निडर दैनिक

# शौर्य मराठी

वर्ष : – १ ले | अंक :– ०४ | गुरुवार दि. ७ नोव्हेंबर २०२४ पान :– ४ किंमत ५ रु. | जळगाव

## मुंबईचा 'किंग' कोण, ३६ मतदारसंघात अटीतटीची लढत

मुंबई : मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघात अटीतटीची लढत पाहायला मिळणार आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर ही पहिलीच निवडणूक असल्याने सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. मुंबईतील माहीम, वरळी, वांद्रे (पूर्व), मानखुर्द, शिवडी या मतदारसंघातील लढती सर्वाधिक प्रतिष्ठेच्या ठरल्या आहेत.

मुंबईतील बहुतांश मतदारसंघात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी विरुद्ध मनसे अशी तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. मुंबईतील ३६ विधानसभा मतदारसंघात ४२० उमेदवार रिंगणात उतरले आहेत. येत्या विधानसभा




निवडणुकीत महाविकास आघाडीने मुंबईतील ३६ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. यात शिवसेना ठाकरे गटाचे २२, कॉंग्रेस ११ आणि शरद पवार गट २ तसेच एका जागेवर समाजवादी पार्टीने उमेदवार दिला आहे. तर महायुतीकडून भाजप १८, शिंदे गट १६ आणि अजित पवार गट २ जागांवर उमेदवार रिंगणात आहे.

तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने मुंबईत २५ उमेदवार दिले आहेत. यामुळे मराठी मतदारांच्या मतांमध्ये फूट पडण्याची शक्यता आहे. मनसेच्या उमेदवारांमुळे महायुती आणि महाविकास आघाडी या दोघांचे आव्हान वाढले आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत मुंबईतील ३६ जागांपैकी सर्वाधिक जागा महायुती जिंकेल, असा दावा भाजपचे मुंबई अध्यक्ष आशिष शेलार यांनी केला आहे; तर ठाकरे गटाचे आमदार अनिल परब यांनी भाजपवर टीका केली आहे. भाजप सत्ता मिळवण्याच्या हव्यासापोटी आपल्या मित्रपक्षांना कमकुवत करते. मात्र माझ्या पक्षाने मित्रपक्षांना बळ दिले आहे, असे अनिल परब यांनी म्हटले.

## तुमच्याकडे कारचे ड्रायव्हिंग लायसन्स असेल तर... सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय; अनेकांना होणार फायदा

नवी दिल्ली–रस्ते अपघातांसाठी फक्त लाइट मोटर व्हीकल लायसेन्स असणाऱ्या वाहनचालकांना दोषी ठरवले जाऊ शकत नाही. दुर्घटनेची इतरही कारणे आहेत. अशी टिप्पणी करत सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या संविधानपीठाने निर्णय दिला की लाइट मोटर व्हीकल (एलएमव्ही) परवाना धारक ७५०० किलोहून वजनाने हलके ट्रान्सपोर्ट वाहन देखील चालवू शकतात.

सर्वोच्च न्यायालयाच्या संविधानपीठाने २०१७ चा आपला निर्णय कायम ठेवला आहे. यामध्ये एमएमव्ही परवाना धारकांना ७५०० किलोग्रॅम पर्यंत परिवाहन वाहने चालवण्याची परवानगी देण्यात आली होती. म्हणजेच हलकी वाहने चालवण्याचा परवाना असणाऱ्यांना सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला आहे.

आता एलएमव्ही परवाना धारक ७५०० किलोग्रॅमचे ट्रान्सपोर्ट वाहने देखील चालवू शकतील.



तसेच अपघात झाल्यानंतर विमा कंपन्या क्लेम देण्यास नकार देऊ शकणार नाहीत.

हलके वाहन चालवण्याचा परवाना असणाऱ्या चालकांना ७ हजार पाचशे किलोग्रॅम वजनाचे कमर्शियल वाहन चालवण्याचा अधिकार आहे की नाही? या मुद्द्यावर सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला आहे.

या मुद्द्यावर सीजेआय चंद्रचूड यांच्या अध्यक्षतेखालील संविधानपीठाने २१ ऑगस्ट रोजी सुनावणी पूर्ण केली आणि आपला निर्णय राखून ठेवला होता.संविधापीठामध्ये सीजेआय डी वाय चंद्रचूड, जस्टिस ऋषिकेश रॉय, जस्टिस पीएस नरसिम्हा, जस्टिस पंकज मिथल आणि जस्टिस मनोज मिश्रा यांचा सहभाग होता.

सर्वोच्च न्यायालयाने आपल्या निर्णयात म्हटले की रस्ते सुरक्षा जागतिक स्तरावर एक गंभीर समस्या आहे. भारतात रस्ते अपघातांमुळे २०२३ मध्ये १.७ लाख लोकांचा मृत्यू झाला आहे. पण याबाबत सर्वकाही हलक्या वाहन चालकांमुळे झाले म्हणणे निराधार आहे. वाहन चालवण्यासाठी विशेष कौशल्यांची गरज असते आणि रस्त्यांवरील अपघातांपासून दूर राहण्यासाठी काळजी घेणे आणि लक्ष विचलीत न होऊ देणे गरजेचे असते.

सर्वोच्च न्यायालयाने म्हटले की कोर्टाच्या या निर्णयामुळे हलकी वाहने चालवणाऱ्या चालकांना विमा क्लेम करण्यास देखील मदत होईल, जे ७ हजार ५०० किलोग्रॅमहून कमी वजनाची वाहने चालवतात.

परवाना प्रक्रिया स्थिर राहू शकत नाही, आम्ही आशा व्यक्त करतो की सध्याच्या उणीवा दूर करण्यासाठी सरकार कडून योग्य ती पावले उचलली जातील आण अटॉर्नी जनरल यांनी आश्वासन दिले आहे की असे केले जाईल.

## जम्मू–काश्मीर विधानसभेत कलम ३७० पुन्हा लागू करण्याचा ठराव मंजूर

जम्मू : जम्मू–काश्मीर विधानसभेच्या अधिवेशनाच्या आजच्या तिसऱ्या दिवशी कलम ३७० पुन्हा लागू करण्यासंदर्भात ठराव मंजूर करण्यात आला. भाजप आमदारांचा विरोधात असतानाही उपमुख्यमंत्री सुरिंदर कुमार चौधरी यांनी हा ठराव विधानसभेत मांडला. या ठरावाला सत्ताधारी नॅशनल कॉन्फरन्स आणि कॉंग्रेसचा पाठिंबा मिळाला.

यावेळी देशविरोधी अजेंडा असल्याचे सांगत भाजप आमदारांनी '५ ऑगस्ट झिंदाबाद' आणि 'मुखर्जींनी बलिदान दिले, ते काश्मीर आमचे आहे' अशा घोषणा दिल्या. अब्दुल्ला परिवार आणि नॅशनल कॉन्फरन्सने लोकांना भावनिक ब्लॅकमेल करण्यासाठी हा ठराव मंजूर केल्याचा आरोप करत कलम ३७० हटवण्याचा निर्णय अंतिम असल्याचे भाजप नेत्यांनी म्हटले आहे.

केंद्र सरकारने ५ ऑगस्ट २०१९ रोजी जम्मू–काश्मीरमधून कलम ३७० हटवून राज्याचे दोन



केंद्रशासित प्रदेशांमध्ये विभाजन करण्याचा निर्णय घेतला होता. या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. ११ डिसेंबर २०१३ रोजी सर्वोच्च न्यायालयाच्या पाच न्यायाधीशांच्या खंडपीठाने केंद्राचा निर्णय कायम ठेवला होता.

दरम्यान, नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत, नॅशनल कॉन्फरन्सने आपल्या जाहीरनाम्यात जम्मू–काश्मीरला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याचे आणि कलम ३७० पुन्हा लागू करण्याचे आश्वासन दिले होते.

जम्मू आणि काश्मीर विधानसभेत मंजूर करण्यात आलेल्या ठरावात म्हटले आहे की, ही विधानसभा विशेष दर्जा आणि घटनात्मक हमींच्या महत्त्वाची पुष्टी करते. ज्याने जम्मू आणि काश्मीरच्या लोकांची ओळख, संस्कृती आणि अधिकारांचे संरक्षण केले. तसेच, हे अधिकार एकतर्फी संपुष्टात आणल्याबद्दल चिंता व्यक्त करते. यासह, विधानसभा भारत सरकारला विशेष दर्जा, घटनात्मक हमी आणि तरतुदी पुनर्संचयित करण्यासाठी घटनात्मक व्यवस्था निर्माण करण्यासाठी जम्मू आणि काश्मीरच्या लोकांच्या निवडून आलेल्या प्रतिनिधींशी चर्चा सुरू करण्याचे आवाहन करते.

## विधानसभा निवडणुकीनंतर मुंबईचे पाणी महागणार!

मुंबई : लोकसभा व विधानसभा निवडणुकीमुळे गेल्या दोन वर्षांपासून पाणीपट्टी वाढ सरकारने रोखून धरली होती. मात्र आता विधानसभा निवडणुकीनंतर मुंबईचे पाणी महागणार आहे. सुमारे ८ टक्केपर्यंत ही पाणीपट्टी वाढण्याची शक्यता असून याची अंमलबजावणी तातडीने करण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे.

पाणीपट्टीत वाढ झाल्यानंतर घरगुती व व्यावसायिक पाणीपट्टीत किमान प्रति एक हजार लिटर मागे ५५ पैसे ते ६ रुपये पर्यंत वाढ होण्याची शक्यता आहे. त्याशिवाय नियमानुसार ७० टक्के मलनि:सारण शुल्क स्वतंत्र द्यावा लागणार आहे.




जल अभियंता खात्याचा आस्थापना खर्च, प्रशासकीय खर्च, प्रचालन व परिरक्षण खर्च, विद्युत खर्च व शासनाच्या भातसा व अप्पर वैतरणा धरणातून उपसा केलेल्या पाण्याची पाणीपट्टी यांच्या एकत्रिक खर्चाचा आढावा घेतला असता खर्च वाढलेला दिसून आला. त्यामुळे गेल्या वर्षभरापासून मुंबई महापालिका पाणीपट्टी वाढ करण्यासाठी राज्य सरकारकडे परवानगी मागत आहे. परंतु निवडणुका लक्षात घेऊन, राज्य सरकारने पाणीपट्टी वाढीस महापालिकेला परवानगी दिली नाही. त्यामुळे पालिकेला किमान ३०० कोटी रुपयांच्या महसुलावर पाणी सोडावे लागले आहे.

प्रतिवर्षी ८ टक्केपर्यंत पाणीपट्टीत वाढ करण्याचा अधिकार स्थायी समितीने पालिका प्रशासनाला दिला आहे. त्यामुळे दरवर्षी १६ जूनपासून पाणीपट्टीत वाढ करण्यात येते. मात्र गेल्या दोन वर्षापासून राजकीय हस्तक्षेपामुळे रखडलेली पाणीपट्टी वाढ विधानसभा निवडणुकीनंतर करण्याचा निर्णय मुंबई महापालिकेने घेतला आहे.

## पोलिस महासंचालकांच्या नियुक्ती संदर्भात 'तात्पुरत्या' शब्दावर कॉंग्रेसचा आक्षेप

मुंबई : राज्याच्या पोलिस महासंचालकांच्या नियुक्ती संदर्भात पुन्हा एकदा कॉंग्रेसने आक्षेप घेतला आहे. राज्य सरकारने संजय कुमार वर्मा यांची नियुक्ती पोलिस महासंचालकपदी तात्पुरती दाखवली आहे. मात्र निवडणूक आयोगाने तात्पुरती नियुक्ती करा असे आदेश दिलेले नसल्याचे सांगत या नियुक्तीवरून कॉंग्रेस पुन्हा एकदा निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार आहे.

कॉंग्रेसच्या तक्रारीवरून दोन दिवसांपूर्वीच निवडणूक आयोगाने रश्मी शुक्ला यांची बदली करण्याचे आदेश दिले होते. त्यानंतर या पदावर संजय कुमार वर्मा यांची नियुक्ती करण्यात आली आहे. निवडणूक काळात एवढ्या मोठ्या जबाबदार पदावरती तात्पुरती नियुक्ती करता येत नसल्याचा कॉंग्रेसचा आक्षेप आहे. त्यामुळे या नियुक्तीच्या विरोधात कॉंग्रेस पुन्हा एकदा निवडणूक आयोगाकडे तक्रार करणार आहे.

शुक्ला यांच्यावर २०१९ सालच्या कथित फोन टॅपिंग प्रकरणात आरोप झालेले असताना निवडणुकीदरम्यान त्यांना पोलिस महासंचालकपदी ठेवू नका, अशी मागणी महाविकास आघाडीने केली होती. ती मागणी मान्य करत



आयोगाने शुक्लांना पदमुक्त केले. तसेच, शुक्ला यांची जबाबदारी राज्यातील सर्वांत वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्याकडे द्यावी असे आदेशही आयोगाने दिले. त्यानंतर राज्य सरकारने संजय कुमार वर्मा यांची पोलिस महासंचालकपदी नियुक्ती केली. पण त्यामध्ये तात्पुरती नियुक्ती असा शब्द वापरण्यात आल्याने त्यावर कॉंग्रेसने आक्षेप घेतला.

संजय कुमार वर्मा यांची नियुक्ती ही विधानसभा निवडणूक होईपर्यंत करण्यात येत आहे. रश्मी शुक्ला यांना विधानसभा निवडणूक होईपर्यंत तात्पुरते सक्तीच्या रजेवर पाठवण्यात येत आहे.मतदानाच्या १५ दिवस आधी राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला यांची बदली करण्यात आली होती. निवडणूक आयोगाच्या आदेशांनंतर हा निर्णय घेण्यात आला.

रश्मी शुक्ला या पक्षपाती असल्याचा आरोप कॉंग्रेसने केला होता. प्रदेशाध्यक्ष नाना पटोलेंनी दोनच दिवसांपूर्वी निवडणूक आयोगाला पत्र लिहित झारखंड, पश्चिम बंगालच्या पोलिस महासंचालकांना हटवले तर महाराष्ट्रात का कारवाई होत नाही असा सवाल केला होता.



## राज ठाकरेंचा मनोज जरांगेंना सवाल,निवडणूक लढवा, पाडापाडी करा पण मला येवढं सांगा..हे आरक्षण तुम्ही देणार कसे ?

मुंबई– मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीतून माघार घेण्याचा निर्णय घेतला आहे. एका जातीवर निवडणूक लढणे आणि जिंकणे शक्य नाही. त्यामुळे समाज बांधवांनी आपले अर्ज मागे घ्यावे. उमेदवार द्यायचा नाही, आता कोणाला पाडायचे ते पाडा आणि कोणाला आणायचे ते आणा, असे आवाहन मनोज जरांगे पाटील यांनी केले. मनोज जरांगे पाटील यांनी निवडणुकीतून माघार घेतल्यानंतर राजकीय वर्तुळातून प्रतिक्रिया येत आहे.

अशात मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी पुन्हा एकदा मरक्तहि आरक्षणावरून राज्यातील पक्षांवर निशाणा साधला आहे. आणि मराठा उपोक्षणकर्ते मनोज जरांगे–पाटील यांच्या भूमिकेवर देखील प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

राज ठाकरे म्हणाले,'मराठा आरक्षणासंदर्भात मनोज जरांगे उपोक्षणाला बसले. त्यानंतर ते म्हणाले विधानसभेच्या निवडणुका लढवणारमग काही दिवसांनी सांगितले, निवडणूक लढवणार नाही, पाडापाडी करणारतुम्हाला निवडणुका लढवायची असेल तर लढवा, पाडायचं असेल तर पाडापण प्रश्न इतकाच आहे की, हे आरक्षण तुम्ही देणार कसे आहात, येवढं मला फक्त सांगा..'

ते पुढे म्हणाले, मराठा आरक्षणासंदर्भात जेव्हा मोर्चा मुंबईत आला होता, तेव्हा व्यासपीठावर शिवसेना, भाजप, राष्ट्रवादी कॉंग्रेस, कॉंग्रेसचे नेते बसले होते. यावेळी चारही पक्षांनी आम्ही मराठा समाजाला आरक्षण देऊ असं सांगितलं होतं. मग आजपर्यंत मराठा समाजाला आरक्षण का दिलं नाही?, असा सवाल राज ठाकरेंनी उपस्थित केला.

मी मराठा समाजाचे इतके शिस्तबद्ध मोर्चे आजपर्यंत इतिहासात कधी पाहिले नव्हते, असंही राज ठाकरेंनी सांगितले. मनोज जरांगे यांनी काही दिवसांपूर्वी राज्यात विधानसभेच्या निवडणुका लढवणार अशी घोषणा केली होती. मात्र त्यानंतर निवडणूक न लढवता पाडापाडी करणार असल्याची भूमिता जाहीर केली. यावर राज ठाकरे यांनी आज लातूरमधील जाहीर सभेत भाष्य केलं आहे.

## संसदेचे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबरपासून

नवी दिल्ली–संसदेचे हिवाळी अधिवेशन २५ नोव्हेंबर ते २० डिसेंबर दरम्यान होणार आहे. अध्यक्षांच्या अभिभाषणाने पारंपारिक पद्धतीने अधिवेशनाची सुरुवात होईल, अशी माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली. हिवाळी अधिवेशनात संसदेच्या दोन्ही सभागृहात अनेक महत्त्वाच्या विधेयकांवर विचार केला जाऊ शकतो. वृत्तानुसार, सरकार 'एक देश एक निवडणूक' या मुद्द्यावर चर्चा करू शकते. संसदीय पद्धतीनुसार, सभागृहाचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी सरकार



आणि लोकसभा अध्यक्ष संसदेच्या अधिवेशनापूर्वी सर्वपक्षीय बैठक देखील घेऊ शकतात.

**या मुद्द्यांवर चर्चा होण्याची शक्यता ?**–संसदेच्या हिवाळी अधिवेशनात 'वन नेशन वन इलेक्शन' आणि वक्फ कायद्यातील दुरुस्तीसाठी सादर करण्यात आलेल्या विधेयकावर चर्चा होण्याची शक्यता आहे. विरोधकांची आक्रमक वृत्ती लक्षात घेता आगामी हिवाळी अधिवेशन चांगलेच गाजण्याची शक्यता आहे. 'वन नेशन वन इलेक्शन'च्या प्रस्तावाला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. आता हिवाळी अधिवेशनात विधेयक मंजूर करण्यावर भर दिला जाणार आहे.

**मध्यवर्ती कक्षात विशेष बैठकीचे आयोजन**

२६ नोव्हेंबरला संविधानाच्या ७५ व्या वर्धापन दिनानिमित्त जुन्या संसद भवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये विशेष संयुक्त बैठक आयोजित केली जाणार आहे. राज्यघटनेचे महत्त्व अधोरेखित करण्यासाठी सरकारने सर्वसमावेशक योजना आखली आहे.

## जिल्हा सांख्यिकी कार्यालयातर्फे शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष–२०२४ तयार करण्याचे काम सुरू

जळगाव (जिमाका वृत्तसेवा) : जिल्हा सांख्यिकी कार्यालयातर्फे शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष–२०२४ तयार करण्याचे काम सुरू आहे. त्यासाठी आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी (DDO) अधिनस्थ अधिकारी व कर्मचाऱ्यांची माहिती सादर करावी, असे जळगाव जिल्हा सांख्यिकी कार्यालयाचे सांख्यिकी अधिकारी श्री. समीर दि.भालेराव यांनी प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

शासकीय कर्मचाऱ्यांचा सर्वंकष माहितीकोष–२०२४ यामध्ये जिल्ह्यातील सर्व आहरण व संवितरण अधिकारी (DDO) यांनी त्यांच्या अधिनस्थ असलेल्या अधिकारी व कर्मचारी यांची माहिती १जुलै २०२४ या संदर्भ दिनांकास अनुसरुन संगणकीय आज्ञावलीत भरुन जिल्हा सांख्यिकी कार्यालयाकडून तपासून घेणे अभिप्रेत आहे.

जिल्हा कोषागार कार्यालयात आहरीत झालेल्या जुलै २०२४ मधील वेतन देयकावरुन मंजूर पदे, भरलेली पदे, रिक्त पदांची आकडेवारी तसेच सेवार्थमधून Entry of post ची एक प्रत उपसंचालक,

जिल्हा सांख्यिकी कार्यालय, जळगाव यांना सादर करुन Login ID व Password घेवून जाणे आवश्यक आहे. तसेच EMDB २०२४ ची माहिती भरताना अधिकारी व कर्मचाऱ्यांचा मोबाईल क्रमांक, ई–मेल आय–डी अद्ययावत करावयाचा आहे. जिल्हा सांख्यिकी कार्यालयाद्वारा प्रथम प्रमाणपत्र उपलब्ध करुन घ्यावयाची आहे.

जिल्हा सांख्यिकी कार्यालयाद्वारा प्रदान करण्यात आलेल्या प्रथम प्रमाणपत्रशिवाय संबंधित कार्यालयांचे माहे नोव्हेंबर २०२४ (नोव्हेंबर २०२४ पेड इन डिसेंबर २०२४) चे वेतन देयक कोषागार कार्यालयातर्फे स्वीकारण्यात येणार नाहीत.

अधिनस्थ असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचे वेतन अदा करण्यास विलंब टाळण्यासाठी सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी विहीत वेळेत प्रथम प्रमाणपत्र प्राप्त करुन घेत व सर्व शासकीय कर्मचाऱ्यांनी आपली अचूक माहिती आहरण व संवितरण अधिकाऱ्यांनी संगणकीय आज्ञावलीत भरल्याची खात्री करून घ्यावी. असे आवाहन पत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

## विधानसभा पूर्वपिठीकेचे जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांच्याहस्ते प्रकाशन

जळगाव (प्रतिनिधी) – विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ महाराष्ट्र राज्यात सुरु आहे. निवडणुकीत सर्वाधिक लोकशिक्षणाचे कार्य प्रसारमाध्यमाकडून केले जाते. त्यासाठी जिल्हा निवडणूक कार्यालयाच्या सहकार्याने, जिल्हाधिकारी यांच्या सूचनेनुसार जिल्हा माहिती कार्यालयाकडून निवडणुकीचा १९६२ पासूनचा मागोवा घेतलेली जळगाव जिल्ह्यातील ११ विधानसभा मतदारसंघाच्या पूर्वपिठीकेचे प्रकाशन नुकतेच जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी आयुष प्रसाद आणि जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अंकित यांच्या



हस्ते करण्यात आले.यावेळी जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील हे उपस्थित होते.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या अनुषंगाने माध्यमे तसेच अभ्यासकांसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या या पूर्वपिठीकेत जळगाव जिल्ह्यातील ११ विधानसभा निहाय १९६२ सालापासून २०१९ पर्यंत घेण्यात आलेल्या विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीतील विजय / पराभूत उमेदवार त्यांना मिळालेले मतदान याबाबतचा सर्वंकष आढावा घेण्यात आला आहे. तसेच माध्यम प्रामाणिकरण आणि सनियंत्रण समितीच्या कामकाज,आदर्श आचार संहितेत 'काय करावे, काय करू नये ' या संदर्भातील माहिती देण्यात आली आहे. तसेच या पूर्वपीठिकेत विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी आयुष प्रसाद यांचे आवाहन पर मनोगत प्रसिद्ध करण्यात आले आहे. त्यासोबतच प्रथमच या जिल्ह्यातील सर्व सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी यांचे छायाचित्रासह माहिती प्रसिद्ध करण्यात आलेली आहे.

विधानसभा सार्वत्रिक निवडणूक–२०२४ च्या अनुषंगाने महत्वाचे दूरध्वनी क्रमांक देखील या पुस्तिकेत प्रकाशित करण्यात आलेले आहेत.या पुस्तिकेसाठी उपजिल्हा निवडणूक अधिकारी अरविंद अंतुर्लीकर व जिल्हा निवडणूक शाखेचे सहकार्य लाभले आहे

## संपादकीय

# वाढत्या तापमान वाढीचे संकट

हवामान बदलाने मानवी जीवनावर व्यापक परिणाम केला आहे. गेल्या काही दशकात वाढलेले तापमान, अतिवृष्टी, पूर, भूस्खलन, दुष्काळ, विस्थापन यांसारख्या आपत्तीचा फटका थेट अर्थव्यवस्थेला बसलेला आहे. अर्थव्यवस्था ही केवळ कागदी आकडेवारी फुगविणारी व्यवस्था नव्हे, ती देशाच्या समग्र विकासाचे मूल्यांकन आहे. नव्वदोत्तर कालखंडात भारतीय अर्थव्यवस्था तळाशी होती. मात्र, मुक्त अर्थव्यवस्थेच्या वादळात भारतीय अर्थव्यवस्थेचा आलेख सत्तत उंचावत राहिलेला आहे. गेल्या तीन दशकांत हीच अर्थव्यवस्था जगात पाचव्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून उदयास आली आहे, अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्राचा सहभाग कमी असला, तरी अन्नधान्य आणि विविध क्षेत्राला कच्च्या मालाचा पुरवठा करण्यात अग्रेसर आहे. विज्ञान, माहिती तंत्रज्ञान, अंतराळ, वैद्यकीय, ऑटोमोबाईल, अभियंता, भूगर्भशास्त्र यांसारख्या क्षेत्रासह पायाभूत सुविधांची निर्मिती निश्चितच नावीन्यतेच्या ध्यासाने झपाटलेली आहे. या नावीन्यतेतील यश केवळ कालचे किंवा आजचे नाही, त्तर विकासाचे अनेक टप्पे यासाठी खर्ची घालावे लागले.

अर्थव्यवस्थेचा वेग वाढीस असताना कृषी व्यवस्थेला चालना मिळाली काय? पारंपरिक शेती सोडून शेतकरी रासायनिक खतांचा वापर करू लागलेला आहे. मात्र, जमिनीचा पोत घसरलेला आहे. उत्पन्न वाढले; पण शेतातून विष पिकविल्याचा आरोप होत आहे. अर्थात, रासायनिक शेतीचा मानवी आरोग्यावर आणि सजीवसृष्टीवर परिणाम झाला आहे. शेतकऱ्यांना हमीभाव मिळतोय का, त्यांच्यामध्ये अर्थव्यवस्थेसारखी समृद्धी आली का; त्याचे उत्तर नकारार्थीच आहे. देशाचे सकल घरेलू उत्पादन वाढत आहे, पण कमी उत्पन्नवर्गातील लोकांचा फायदा होताना दिसत नाही.

काळ बदलला, जीवनशैली बदलली, खाण्या-पिण्याच्या वस्तू बदलल्या. गरिबी कमी झाली, पैसा वाढला हे खरे असले तरी पोटावर आणून जगणाऱ्यांची संख्या कमी झालेली नाही. त्यामुळे अर्थव्यवस्थेने आकाशाला गवसणी घालताना वंचितांच्या आणि नैसर्गिक विकासासाठी काय करता येईल हे लक्षात घेतले पाहिजे... पण, वातावरणातील बदलाकडे डोळेझाक करून चालणार नाही, कारण जलवायु परिवर्तनाकडे दुर्लक्ष म्हणजे स्वतःच्या पायाला जखम करून घेण्यासारखे आहे. ही ओली जखम झाली तर तुम्हाला चालताच येणार नाही. जलवायू परिवर्तन ही केवळ भारताची नव्हे, तर अखंड जगाची शोधयात्रा ठरलेली आहे. गेल्या दोन दशकांचा विचार केला तर तापमानाने पृथ्वीला विस्कळीत करून ठेवले आहे, महापुरात किती लोकांचा मृत्यू झाला, कृषकजमीन किती पडीक आहे, अन्नधान्याचा साठा वाढला काव, भुकेने किती लोकांचा बळी गेला? अशा कारणांमध्ये नैसर्गिक अधिभार मोठा आहे. निसर्गावर अतिक्रमण केल्याच्या जाणिवा म्हणजे जलवायु परिवर्तन आहे? वातावरणाने माणसांच्या आरोग्याचा सूड घेण्याचे ठरविलेले दिसत असताना युद्धाने जगात अशांतता नांदत आहे. युद्धाचा पृथ्वी किंवा समुद्रावर परिणाम होत नाही का? सकल घरेलू उत्पादनावर परिणाम होतो, हे युद्धखोरांना कळत नाही असे नाही; पण ते दुसऱ्यांवर प्रभाव गाजविण्याच्या इर्षेने पेटलेले आहेत. काळाची संकटे ही मानवी हिताविरोधात असतील तर या जगाचे मानवी धोरण काय? गेल्या दशकभरात तापमानाचा सर्वाधिक त्रास ज्येष्ठांसह चिमुकल्यांना झालेला आहे.

२०२३ मध्ये तापमानाच्या चक्रव्यूहात भारतीय कृषी क्षेत्राला तब्बल ७१.९ अब्ज डॉलरच्या नुकसानीची झळ बसली. एवढेच नव्हे तर १९८० च्या दशकात जगभरात असलेल्या पडीक जमिनीचे क्षेत्र तीन पटीने वाढले! हे कोणाला आश्चर्य वाटत असले तरी सत्य हे शाश्वत असते. काही दिवसांपूर्वीच आशियाई विकास बँकेचा एक अहवाल आला. हा धक्कादायक अहवाल भारताला चिंतन करण्यास भाग पाडणारा आहे. अर्थात ज्या गतीने जीडीपी वाढलेली दिसत आहे, ती गती जलवायु परिवर्तनामुळे २०७० पर्यंत खंडित होण्याचा धोका आहे. जीडीपीचे २४.७ टक्के नुकसान होण्याचा अंदाज, खरे तर संकटाची नांदी आहे. ही नांदी अशीच कायम राहिली तर प्रशांत-आशिया क्षेत्रातील जीडीपीचे १६.९ टक्के नुकसान होईल, तेव्हा भारत कुठे असेल? अहवालानुसार, समुद्राचा स्तर वाढला आणि श्रमिक उत्पन्न कमी झाले तर गंभीर नुकसानीचा धोका आहे. हे नुकसान कमकुवत अर्थव्यवस्थांना मारक ठरणार आहे. जलवायू परिवर्तनासारख्या संकटावर आजच मात करण्याचा प्रयत्न केला नाही, तर पुढच्या पंचवीस वर्षांत ३० कोटी माणसं पुराच्या वेढ्यात अडकले तर कोणाला नवल वाटायला नको, जलवायू परिवर्तनाने उष्णकटिबंधीय वादळ, उच्च तापमान आणि पुरासारख्या विनाशकारी संकटाला मोठी चालना मिळालेली आहे. पर्यायाने आर्थिक आव्हाने वाढतानाच मानवी समस्यांचा अवाका वाढलेला दिसेल. भारतासह बांगलादेश, पाकिस्तान, व्हिएतनाम, इंडोनेशिया यांसारख्या देशांच्याही सकल घरेलू उत्पादनात अर्थात जीडीपीत घसरण होईल. विशेषतः २००० नंतर विकासशील आशियाचा जागतिक ग्रीनहाऊस गैस उत्सर्जनात सर्वांत मोठा वाटा राहिलेला आहे. मग विकसित राष्ट्र कुठे आहेत? यांचे खाण्याचे दात अन् दाखवायचे दात कुठे आहेत? एकविसाव्या शतकातील ही दोन दशके जगाला परंपरांकडून आधुनिकतेकडे घेऊन जाणारे ठरलेले आहे. आधुनिकतेच्या गप्पा सुरू आहेत, मात्र हवामानाचा बदललेला पॅटर्न या आधुनिकतेवर बुरखा पांघरणारा ठरणार नाही का? जिथे अंटार्क्टिका, हिमालयावर परिणाम होऊ शकतो तिथे अर्थव्यवस्था अन् माणूस कुठे राहील. अर्थव्यवस्था, जीडीपी, वातावरण, हवामान, मानवी जगणं हे एकमेकांना पूरक हवे, हे नसेल तर डोळ्यांच्या अफाट आठवणी हुंदके देण्यास भाग पाडणाऱ्या राहणार आहेत. माणूस जगला पाहिजे, पर्यावरणही टिकले पाहिजे.

# नाईक विद्यालयातील स्नेहमेळाव्यात वर्गमित्रांची २६ वर्षानंतर रंगली गप्पांची मैफल



जामनेर : तालुक्यातील पाळधी येथील श्रीमती क. द. नाईक माध्यमिक विद्यालयात २६ वर्षापूर्वी दहावीत शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांचा नेहमेळावा साजरा करण्यात आला. या स्नेह मेळाव्यात तत्कालीन वर्गमित्रांनी शाळेतील जुन्या आठवणींना उजाळा दिला. पाळधीतील क. द. नाईक विद्यालयात सन १९९८मध्ये दहावीत शिक्षण घेणाऱ्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी आपल्याला त्या वेळी शिकवणाऱ्या शिक्षकांना व आपल्या वर्ग मित्र मैत्रीणींना भेटून अतिशय आनंद झाला, या वेळी बरेच जण भावूक झाले होते.

प्रारंभी उपस्थित सर्व गुरुजनांचा सत्कार करण्यात आला. निवृत्त मुख्याध्यापक डब्ल्यू. एस. पाटील यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शालेय परिसरात गुरुजनांच्या व मुलींच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर दिवंगत गुरुजन व चार वर्ग मित्रांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी, विद्यार्थिनींनी शिक्षकांप्रती आणि वर्गमित्रांप्रती असलेल्या आदर व प्रेमापोटी जिव्हाळा व्यक्त करणारे व जुन्या आठवणींना उजाळा देत मनोगत व्यक्त केले. तसेच शाळेचे ऋण आम्ही कधीही विसरू शकणार नाहीत. तर गुरूजनांबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. यात योगिता भोंबे, नम्रता पाटील, तीर्थराज इंगळे, अमोल बाविस्कर, सचिन पाटील, दत्ता माळी, विजय बोरसे, नंदा पाटील, राजू गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले. * पाटील, आर. डी. चौधरी, एन. जी. पाटील, एन. डी. सुशिर, सभाष पाटील व विद्यमान मुख्याध्यापक एस. एन. पाटील उपस्थित होते.

कामानिमित्त व नोकरीसाठी गेलेले मित्र २६ वर्षानंतर यानिमित्त एकत्र आले होते. या वेळी माजी मुख्याध्यापक डबल्यू. एस. पाटील, एस. जी. माळी, एम. एल. पाटील, डी. टी. बाविस्कर, सी. एम. मोरे, डी. एस. कार्यक्रमानंतर उपस्थित सर्व वर्ग मैत्रीणींना साड्यांची भेट देण्यात आली. तर मयत विद्यार्थ्यांच्या परिवाराला ही साडी भेट देण्यात आली. या कार्यक्रमासाठी योगेश भोम्बे, कैलास परदेशी, प्रवीण चौधरी, देवचंद परदेशी, डॉ. संभाजी पाटील, मधुकर बावस्कर, ईश्वर भिल्ल, संतोष माळी, गजानन गुरव आदींनी सहकार्य केले. प्रास्ताविक गणेश पाटील, सूत्रसंचालन ईश्वर भिल्ल तर तीर्थराज इंगळे यांनी आभार मानले.

# खाद्य तेलाची चोरी उघड; सुरतेतुन मुद्देमाल हस्तगत

धुळे : अपघाताचा बनाव करुन फसवणूक करीत टँकरमधील सुमारे १८ टन खाद्य तेलाची चोरी केल्याचा प्रकार धुळे तालुका पोलिसांनी उघडकीस आणला आहे. परंतु गुन्ह्यातील संशयित टैंकर चालकाचे सूरत (गुजरात) येथे एका मोटार अपघातात निधन झाले. तसेच सूरत पोलिसांनी अवैध खाद्य तेलाचा साठा जप्त केला होता. धुळे तालुका पोलिसांनी तपास चक्र फिरवून हे खाद्य तेल हस्तगत केले आहे. सूरत यासंदर्भात, गुजरात राज्यातील गांधीधाम, कच्छ येथुन एका तेल कंपनीकडुन प्रेमदास प्रल्हाद सैनानी रा. अमळनेर जि. जळगांव यांनी व्यापारासाठी खाद्यतेलाच्या ३२ टन मालाची ४० लाख रुपयात खरेदी केली होती. हा माल वाहतुक करुन त्यांना जळगांव येथे आणावयाचा होता. त्याकरीता त्यांनी गांधीधाम येथील युगऋशी ट्रान्सपोर्ट कंपनीकडुन टँकरची भाडे तत्वावर मागणी केली असता खाद्यतेलाच्या वाहतुकीसाठी टँकर (जीजे १२/सीटी-०५५०) चालकासह पुरवण्यात आला होता. हा टँकरद्वारे खाद्य तेल हे गुजरात येथुन जळगावकडे घेवुन येत असतांना दि.१ नोव्हेंबर रोजी पहाटे १ वाजेच्या सुमारास मोराणे जवळ अकलाड फाटा येथे अपघात होवुन टँकर उलटल्याबाबत प्रेमदास सैनानी यांनी धुळे तालुका पोलिसांना कळविले होते.

पोलिसांनी अपघातग्रस्त टँकरची प्रत्यक्षात घटनास्थळी पहाणी केल्यानंतर टँकरमध्ये शिल्लक खाद्य तेल तसेच जागीच सांडलेले खाद्य तेल यांचे निरीक्षण करता त्यामध्ये मोठी तफावत असल्याचे आढळुन आले. त्यात अंदाजे १५ ते १८ टन खाद्य तेल कमी असल्याचे प्राथमीकदृष्ट्या दिसुन आले. त्यामुळे पुढे तपासाची चक्र फिरवुन टँकरवरील जीपीएस यंत्रणा द्वारे तपासणी करण्यात आली. यात टँकर प्रवासादरम्यान संबंधित खुप वेळ गुजरातमध्ये सुरत शहरानजिक थांबुन असल्याचे आढळले. संबंधीत ठिकाणी जावुन खात्री केली असता त्याठिकाणी तेलाचे अवशेष दिसुन आले. अधिक माहिती घेतली असता त्याच ठिकाणाहुन सुरत येथील स्थानिक पोलिसांनी खाद्य तेलाचा अवैधसाठा म्हणुन

तेथील सर्व खाद्य तेलाच्या टाक्या नुकत्याच कार्यवाही करुन जप्त केल्याचे तपासात आढळून आले. संबंधीत पोलीस ठाण्यास जावुन खाद्य तेलाच्या मालाची खात्री केली. प्रेमदास सैनानी यांना बोलावुन माल दाखवीला असता त्यांनी मालाची तपासणी करुन खाद्य तेलाचा माल हा त्यांचाच असल्याची खात्री झाली. माल कोठुन आला त्याबाबत सखोल माहिती घेतली असता टँकरवरील चालक सवाईराम खेमाराम जाट (४५) रा. राजस्थान, याने विकल्याचे स्पष्ट झाले. याप्रकरणी धुळे तालुका पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल

करण्यात आला. संशयित सवाईराम जाट याचे सूरतमध्ये दि.३

नोव्हेंबर रोजी एका मोटार अपघातात निधन झाले असुन त्याच्याविरुध्द सुरत येथील पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असल्याचे तपासात पुढे आले. या घटनेतील लंपास झालेला सुमारे २० लाख रुपये किमतीचा १८ टन खाद्य तेलाचा माल गुजरात राज्यातुन हस्तगत करण्यात आला आहे. ही कारवाई जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक किशोर काळे पोलीस उपअधीक्षक संजय बांबळे यांच्या मार्गदर्शनाखाल धुळे तालुका पोलीस ठाण्याच्े पोलीस निरीक्षक अभिषेक पाटील, पोलीस उपनिरीक्षक दीपक धनवटे, हेकॉ किशोर खैरनार, प्रविण पाटील, पोक कुणाल शिंगाणे, रवींद्र सोनवणे यांनी केली आहे.

## निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्ह वाटप चिन्हाचे वाटप

धुळे : महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी राज्यात येत्या दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. जिल्ह्यात विधानसभेचे पाच मतदार संघ असून या निवडणुकीसाठी ५६ उमेदवार निवडणुकीच्या रिंगणात आहेत. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात आले. साक्री विधानसभा मतदार संघात एकूण ३० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी १२ उमेदवारांनी माघार घेतली असून आता १८ उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. धुळे ग्रामीण विधानसभा मतदार संघात एकूण १५ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ३ उमेदवारांनी माघार घेतली असून आता १२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहे. धुळे शहर विधानसभा मतदार संघात एकूण २० उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी १२ उमेदवारांनी माघार घेतली असून

जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदार संघात माघारीच्या अखेरच्या दिवशी जिल्ह्यात ४६ उमेदवारांनी माघार घेतली असून आता ५६ उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत. या उमेदवारांना निवडणूक

रिंगणात आहे. शिंदखेडा विधानसभा मतदार संघात एकूण २४ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी १२ उमेदवारांनी माघार घेतली असून आता १२ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहे. शिरपूर विधानसभा मतदार संघात एकूण १३ उमेदवारांचे अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी ७ उमेदवारांनी माघार घेतली असून आता ६ उमेदवार निवडणूक रिंगणात आहे. निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना चिन्ह वाटप करण्यात आले. विधानसभा निवडणुकीसाठी २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार असून २३ नोव्हेंबर २०२४ रोजी मतमोजणी होणार आहे.

## निवडणूक खर्च निरीक्षकांच्या विविध ठिकाणी भेटी

धुळे : विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीसाठी जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदारसंघाकरीता नियुक्त निवडणूक खर्च निरीक्षक रामा नाथन आर यांनी साक्री विधानसभा मतदार संघातील शेवाळी, निजामपूर येथील स्थिर सर्वेक्षण पथकास (एसएसटी) भेट देऊन तेथील परिस्थितीचा आढावा घेतला. जिल्ह्यातील पाचही विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर रोजी मतदान होणार आहे. निवडणुका निर्भयपणे पार पडण्यासाठी भारत निवडणूक आयोगाने निवडणूक खर्च निरिक्षक रामा नाथन आर यांची नियुक्ती केली आहे. या पार्श्वभूमीवर निवडणूक खर्च निरीक्षक रामा नाथन आर यांनी शेवाळी, निजामपूर येथील एसएसटी पथकास भेट देऊन पाहणी केली. तसेच शासकीय गोदाम. तहसिल कार्यालयातील कंट्रोल रूम, सी-व्हीजिल कक्ष, खर्च लेखे कक्ष, वाहन परवाना कक्ष येथील कामकाजाची पाहणी करुन सुरू असलेल्या कामकाजाची माहिती घेतली. त्यानंतर त्यांनी चरणमाळ येथील राज्य सीमेवरील परिवहन विभाग, वन विभाग, राज्य उत्पादन शुल्क विभाग, पोलीस या विभागांच्या संयुक्त स्थिर सर्वेक्षण पथकाला भेट दिली. तेथील वाहन नोंदवहीचीही तपासणी केली. या पथकास आयोगाच्या निर्देशानुसार कार्यवाही करण्याच्या सुचना दिल्यात. येथे नियुक्त अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्यावर सोपविलेली जबादारी काळजीपूर्वक पार पाडावी, या मार्गाने येणाऱ्या प्रत्येक वाहनाची कसून तपासणी करुन वाहनांच्या नोंदी नोंदवहीत घ्याव्यात, असेही सांगितले. यावेळी त्यांच्यासोबत तहसिलदार साहेबराव सोनवणे कार्यकारी अभियंता मुकेश ठाकुर यांचेसह परिवहन, वन विभाग, पोलीस आदि विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

# फटाके फोडण्यावरुन वाद; परस्पर तक्रारीत १० जणांवर गुन्हा दाखल

धुळे : शहरातील साक्री रोडवरील कुमारनगरात फटाके फोडण्यावरून दोन गटात वाद झाला. या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यात एका तरुणावर दोघांनी चाकूने हल्ला केला. दोन मोटारसायकलींवर पेट्रोल टाकून जाळण्यात आल्या तर एका महिलेचा विनयभंग करण्यात आला. याप्रकरणी धुळे शहर पोलीस ठाण्यात परस्परविरोधी फिर्यादीवरुन १० जणांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला असून यातील ५ जणांना पोलिसांनी अटक केली आहे. यांसदर्भात, मनोज गोपालदास तनेजा (५५) रा. कुमारनगर, साक्रीरोड, धुळे यांनी पोलिसात दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, दि.२ नोव्हेंबर रोजी रात्री ११ ते ११.३० वाजेच्या सुमारास फटाके फोडण्यावरून वाद झाला. यात रवी सुरेश मोटवाणी याने त्याच्या हातातील चाकुने लहान भाऊ जितेंद्र तनेजा यास जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने वार केला. मनोज तनेजा यांच्या डोक्यात विट टाकली. मंजित अशोक गाबडा याने पुतण्या मोहित पोपली याच्या डोक्यात विट मारली. याने त्याच्या जितेंद्रवर वार पंकज जिसेजा हातातील चाकुने केला. इशान याने पुतण्या अशोक गाबडा महक पोपली यास त्यानंतर मंजित, रवि तिघांनी दोन मोटारसायकलींवर पेट्रोल टाकून यावरुन मंजित मोटवाणी, पंकज गाबडा या आग लावली. गाबडा, रवी जिसेजा, इशान चौघांविरुध्द भान्यासं २०२३ चे कलम ३२५, एफ, १०९, ३२४, ४४, गुन्हा दाखल ३, ५ अन्वये करण्यात आला

आहे. या गुन्ह्यात पोलिसांनी मंजित गाबडा यास अटक केली आहे. परस्पर विरोधात एका ५८ वर्षीय महिलेने पोलिसात दिलेल्या फिर्यादीनुसार, मागील भांडणाची कुरापत काढून दि.२ रोजी रात्री ११ ते ११.३० वाजेदरम्यान, जितेंद्र गोपालदास तनेजा, मनोज गोपालदास तनेजा, महक दत्तन पोपली, दत्तन गोपालदास पोपली, विनोद गोपालदास तनेजा सर्व रा. कुमारनगर, साक्रीरोड, धुळे या ६ जणांनी मारहाण केली. या मारहाणीत जितेंद्र तनेजा याने महिलेचा विनयभंग केला. विट मारली. व पंकज या मनोज तनेजा याने एका मुलावर चाकुहल्ला केला. महक पोपली याने दुसऱ्या मुलास काठीने मारहाण केली. यावरुन वरील ६ जणांविरुध्द भान्यासं २०२३ चे कलम ७४, ११८ (१), १८९ (२), १९१ (१), (२), १९०, ३५२ सह महाराष्ट्र पोलीस अधीनियम कलम ३७ (१) (३) चे उल्लंघन १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्यात पोलिसांनी मनोज तनेजा, महक पोपली, मोहित पोपली, दत्तन पोपली या चौघांना अटक केली आहे.

# अमळनेर विधानसभा मतदार संघात अडीचशे केंद्रांवर होणार वेबकास्टिंग

## १९० वृद्ध व दिव्यांग मतदारांना घरून मतदानाची सुविधा; निवडणूक निर्णय अधिकारी नितीन मुंडावरे

अमळनेर : विधानसभा निवडणुकीत ३२५ मतदान केंद्र असून ६६ टक्के म्हणजे २५० मतदान केंद्रांवर वेबकास्टिंग करण्यात येणार आहे.

तर ७५ मतदान केंद्रांवर मायक्रो ऑबझर्व्हर नियंत्रण ठेवतील. गेल्या निवडणुकीत कमी मतदान झालेल्या ठिकाणी स्वीप अंतर्गत जनजागृती करण्यात येणार आहे, अशी माहिती निवडणूक निर्णय अधिकारी नितीन मुंडावरे यांनी पत्रकार परिषदेत दिली. रणधुमाळी

निवडणुकीसाठी जवळपास १ हजार ७०० कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तर दूसरे प्रशिक्षण ११ रोजी मतदार संघ बदलवून होणार आहे. निवडणूक कामाला असणाऱ्या कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण स्थळी मतदान पत्रिका देण्यात येणार आहेत. तर त्याच ठिकाणी मतदान केंद्र ही ठेवण्यात येणार आहेत.

आणि जर चुकून या वेळी कर्मचाऱ्यांचे मतदान राहिले तर निवडणूक साहित्य घेताना त्यांना मतदान करावे लागणार आहे. तसेच बंदोबस्ताला असलेल्या पोलीस व इतर कर्मचाऱ्यांना उपविभागीय कार्यालयात पोस्टल वोटिंग सुविधा ठेवण्यात आली आहे. दरम्यान, अमळनेर विधानसभा मतदार संघात ८५ पेक्षा अधिक वयाचे १४९ मतदार आणि ४१ मतदार दिव्यांग आहेत. अशा व्यक्तींना स्वतःच्याच घरी मतदानाची सोय करण्यात आली आहे. त्यासाठी १० पथक नियुक्त केले आहेत. या मतदारांसाठी ८ व ९ रोजी पहिला टप्पा घेतला जाईल.

तरीही जर कोणाचे मतदान राहिले तर नंतर १४ व १५ रोजी दुसरा टप्पा घेतला जाईल. जर दुसऱ्या टप्प्यातही मतदान केले नाही, तर २०२४ मात्र या मतदारांना मतदानाची संधी राहणार नाही, असेही सांगितले. तर ज्या केंद्रांवर आधी कमी मतदान झाले आहे, त्याठिकाणी स्वीप अंतर्गत जनजागृती, संकल्प पत्र भरून घेणे, प्रबोधन करणे असे कार्यक्रम राबवण्यात येणार आहेत. निवडणूक निरीक्षकांनी घेतली आढावा बैठक निवडणूक निरीक्षक रणजितकुमारसिंग यांच्या उपस्थितीत राजकीय पक्षाचे पदाधिकारी, सेक्टर अधिकारी यांची बैठक घेण्यात आली.

त्यांना निवडणुकीच्या संदर्भात आवश्यक त्या सूचना दिल्या आहेत. तसेच आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही, याबाबत काय काळजी घ्यावी, याचेही त्यांनी मार्गदर्शन केले. या वेळी निवडणूक निर्णय अधिकारी नितीन मुंडावरे यांच्यासोबत तहसीलदार रुपेशकुमार सुराणा, मुख्याधिकारी तुषार नेरकर, नायब तहसीलदार प्रशांत धमके, रुपाली अडकमोल, नितीन ढोकणे आदींसह कर्मचारी हजर होते.

कर्मचाऱ्यांना मतदान करण्याच्या पद्धतीत बदल घडवून आणल्याने पोस्टल बॅलेटचा सौदा बंद होणार आहे. पूर्वी निवडणूक कर्मचाऱ्यांना पोस्टल बॅलेट घरी देण्यात येत होते. त्यामुळे कर्मचारी पाकिट घेऊन उमेदवाराच्या घरी जाऊन त्या मताचा सौदा करत असत.

एक हजार ते २ हजाराला हे मत विकले जायचे. काही कर्मचारी तर कोरे पाकीट उमेदवाराकडे देऊन यायचे. त्यामुळे त्या मतपत्रिका दाखवून इतरांचेही मन वळवले जायचे. ही सौदेबाजी थांबवून पारदर्शी मतदान होण्यासाठी आयोगाने आता एक इडिसी पद्धत काढली.

एकाच मतदार संघात निवडणूक ड्युटी असेल तर त्या मतदान केंद्रावर मतदान करता येत होते.

अन्यथा कर्मचाऱ्याला आता प्रशिक्षणाच्या ठिकाणी किंवा साहित्य घेताना मतदान करता येणार आहे. तर कर्मचारी विविध मतदार संघात ड्युटीला जाणार असल्याने मतांचा बाजार होणे अवघड आहे.

निवडणूक अधिकऱ्यांसमोर प्रतिज्ञापत्र भरणे आणि अधिकाऱ्यांसमोर हे सर्व करावे लागणार असल्याने विकाऊ कर्मचाऱ्यांची तर विकत घेणाऱ्या उमेदवारांची चांगलीच गोची झाली आहे. त्यामुळे सौदेबाजीला आळा बसणार आहे. दोन्हीकडून पैसे घेऊन मते बाद होण्याचे प्रमाण ही यामुळे थांबणार आहे.

हे वृत्तपत्र मालक ओतारी रेखाबाई काशिनाथ व प्रकाशक सागर काशिनाथ ओतारी यांनी मुद्रक श्री समर्थ कृपा डिजिटल प्रिंटर्स पी-३३, औद्योगिक वसाहत शॉपिंग कॉम्प्लेक्स, जुनी एमआयडीसी, जळगांव-४२५००१ येथे शॉप नं.ई/१२ चौथा मजला गोलाणी मार्केट, ४२५००१ (महाराष्ट्र) येथे प्रसिध्द केले. ◆ **मुख्य संपादक : सागर काशिनाथ ओतारी * संपादक: नंदलाल मराठे** (९१७५९९६२३२) (* पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख या मधून झालेल्या मतांशी संपादक / सहमत असतीलच असे नाही. **Email- dainikshauryamarathi@gmail.com** (RNI-MAHMAR/2023/89125)

## प्रयत्नांमध्ये सातत्यपूर्ण प्रयत्नांद्वारे यशाचे शिखर गाठता येते -ॲड. संदीप पाटील

चोपडा : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव यांच्यातर्फे 'विद्यापीठस्तरीय युवारंग २०२४' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत चोपडा येथील महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे, दादासाहेब डॉ.सुरेश जी.पाटील महाविद्यालयाने सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले.

'युवारंग २०२४' स्पर्धेत चोपडा महाविद्यालयाच्या उपविजेत्या संघाचा 'गुणगौरव सोहळा' महाविद्यालयाच्या स्मार्ट क्लास मध्ये आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महात्मा गांधी शिक्षण मंडळाचे अध्यक्ष ॲड. संदीप सुरेश पाटील हे उपस्थित होते.या कार्यक्रमाप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून महात्मा गांधी शिक्षण मंडळाच्या सचिव डॉ.



सौ. स्मिताताई संदीप पाटील तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.डी.ए.सूर्यवंशी, उपप्राचार्य प्रा.डॉ.के.एन. सोनवणे व समन्वयक डॉ. शैलेश वाघ, रजिस्ट्रार डी. एम. पाटील आदि मान्यवर उपस्थित होते.

'युवारंग २०२४' या स्पर्धेत चोपडा महाविद्यालयातील संघाने कोलाज -कांस्य पदक, व्यंगचित्र -रजत पदक, समूह गीत (पाश्चिमात्य)- सुवर्ण पदक, शास्त्रीय सुरवाद्य -सुवर्ण पदक, लोकसंगीत -रजत पदक, भारतीय सुगम गायन -रजत पदक, शास्त्रीय तालवाद्य -सुवर्ण पदक, मूकनाट्य - सुवर्ण पदक, समूह लोकनृत्य -सुवर्ण पदक, भारतीय सुगम गीत -कांस्य पदक, स्थळ चित्र -सुवर्ण पदक, इन्स्टोलेशन -रजत पदक

अशा एकूण १३ कला प्रकारात पारितोषिके प्राप्त करीत घवघवीत यश संपादन केले तसेच 'युवारंग २०२४' स्पर्धेचे सर्वसाधारण उपविजेतेपद पटकाविले. यावेळी या स्पर्धेतील विजेत्या सर्व स्पर्धकांचा, मार्गदर्शक तसेच दिग्दर्शक यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

या सत्कार कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष ॲड.संदीप सुरेश पाटील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना म्हणाले की, 'कोणत्याही कार्यात यशस्वी व्हायचे असेल तर आपल्या प्रयत्नांमध्ये सातत्य ठेवले पाहिजे तरच यशाचे शिखर गाठता येते. म्हणून विद्यार्थ्यांनी आपल्यातील जिद्द, चिकाटीच्या जोरावर सतत प्रयत्नशील रहायला हवे'. कमी कालावधीत विद्यार्थ्यांनी केलेल्या कलाविष्कारांचे कौतुक करून त्यांनी विद्यार्थ्यांना पेढे भरवून अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. सूर्यवंशी यांनी यशस्वी संघांचे कौतुक केले व विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. शैलेश वाघ यांनी केले तर प्रास्ताविक संघप्रमुख डॉ. हरेश चौधरी यांनी केले. या कार्यक्रमाप्रसंगी युवारंग स्पर्धेतील विजेते स्पर्धक, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी बंधू-भगिनी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## एरंडोल येथे दिपोत्सव उत्साहात

एरंडोल :- येथील पांडवनगरी बहुउद्देशीय संस्था आणि सकल हिंदू समाज यांच्या संयुक्त विद्यमाने पाडव्यानिमित्त पांडववाड्यासमोर असलेल्या पटांगणावर ५१०० दिवे लाऊन आयोध्या येथील श्रीराम मंदिराची भव्य प्रतिकृती उभारण्यात आली होती.यावेळी मारुती मंदिरात सामुहिक आरती करण्यात आली. शहरात दिवाळीनिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी शेकडो महिला व युवकांनी पटांगणावर सुमारे ५१०० दिवे लावून आयोध्या येथील श्रीराम मंदिराची प्रतिकृती तयार केली. यावेळी फटाक्यांची भव्य आतषबाजी करून श्रीराम, बजरंगबली यांच्या जयघोषाच्या घोषणांनी परिसर दणाणून गेला होता.




तसेच श्रीरामाचे लावण्यात आलेले भव्य फोटो भाविकांचे लक्ष वेधून घेत होते.यावेळी हनुमान मंदिरात जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अमोल पाटील यांच्या पत्नी मृणाल पाटील,हिमालय पेट्रोल पंपाचे संचालक भगवान महाजन डॉ.राखी काबरा,क्षमा साळी,आरती ठाकुर,रवींद्र पाटील, ,माजी नगराध्यक्ष राजेंद्र चौधरी,रवींद्र महाजन,समन्वय समितीचे माजी अध्यक्ष रमेश महाजन,धनश्री इन्फ्रास्ट्रक्चरचे संचालक राहुल तिवारी, आर.डी. पाटील,सुनील चौधरी,पांडववाडा संघर्ष समितीचे प्रमुख प्रसाद दंडवते,परेश बिर्ला ,राज पाटील, नरेश बागा, व संस्थाचे सर्व पदाधिकारी यांचेसह आदी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सामुहिक आरती करण्यात आली.

## भरदिवसा वकीलाच्या घरातून सोन्याचे दागिने घेऊन डोळ्यासमोरून चोरटा पसार

जळगाव ( प्रतिनिधी ) - शहरातील प्रसिद्ध गणेश कॉलनी परिसरात राहणाऱ्या ड. प्रताप निकम यांच्या घरात एका चोरट्याने त्यांच्या डोळ्यासमोरच भरदिवसा डल्ला मारला.

घरातून तब्बल १४ तोळे सोने चोरीस गेले आहे. संबंधित पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ॲड. निकम यांनी १ नोव्हेंबर रोजी घरात लक्ष्मीपुजनासाठी १४ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व काही चांदीच्या वस्तु देवासमोर ठेवल्या होत्या. रात्रभर पुजा तशीच होती. २ नोव्हेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता ॲड. प्रताप हे घरासमोर मंदिरात दर्शनासाठी गेले. यावेळी त्यांच्या पत्नी घरात तर मुलगा वरच्या मजल्यावर होता.

ही संधी साधुन एक चोरटा त्यांच्या घरात शिरला. चोरट्याने सर्व दागिने उचलून घेत पलायन केले. चोरटा घराबाहेर निघण्यापूर्वी ॲड. वकील हे घरात आले.त्यांनी चोरट्याला दोन वेळा पकडण्याचा प्रयत्न केला. परंतु, चोरट्याने धक्का देऊन पळ काढला.

## युवारंग महोत्सवात जी. एच. रायसोनी महाविद्यालयाची उत्कृष्ट कामगिरी

### ३ पदकं मिळवून नेत्रदीपक यश ; संचालिका प्रा. डॉ. प्रिती अग्रवाल यांनी केले विध्यार्थ्यांचे कौतुक

जळगाव: कवियित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ जळगाव येथे नुकतेच विद्यापीठस्तरीय युवारंग महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. या विद्यापीठस्तरीय युवामहोत्सव स्पर्धेत जळगाव, धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील अनेक महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. या युवारंगात जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट महाविद्यालयाच्या संघाने १ सुवर्ण, १ रोप्य तर १ कांस्य पदकांवर आपली मोहोर उमटवली.

यात क्रीतिका राजेश कटपाल या विद्यार्थिनीने वेस्टर्न व्होकल सोलो या कला प्रकारात उत्कृष्ट सादरीकरण करत सुवर्ण पदक प्राप्त केले.



रोनित सतीश नेवे, भूषण जगतराव पाटील, प्रणव विनोद इखे, प्रतिक भाऊराव दांडगे, जान्हवी देविदास चितळे व क्रीतिका कटपाल यांच्या संघाने वेस्टर्न ग्रुप सॉन्ग कलाप्रकारात उत्कृष्ट सादरीकरण करीत रोप्यपदक प्राप्त केले तर इंडियन क्लासिकल डान्स या स्पर्धेत अक्षया शशांक दानी हिला कांस्य तर स्वरांगी प्रमोद शार्वगी या विध्यार्थिनीला मराठी भावगीत स्पर्धेत उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. या स्पर्धेत महाविद्यालयातील एकूण ३० विद्यार्थ्यांचा संघ सहभागी झाला होता. त्यात प्रतीक्षा जोशी, भाविका घाटे, कन्हेया चौधरी, रिया तळेले, इम्रान शेख व हितेश मोरे यांनी इतर कला प्रकारात उत्कृष्ट सादरीकरण केले. महाविद्यालयातील संघाने माईम, वाद-विवाद व वक्तृत्व स्पर्धेतसुद्धा ताकदीने सादरीकरण करून प्रेक्षकांची दाद मिळवली.

या संघाचे संघव्यवस्थापक व मार्गदर्शक म्हणून विध्यार्थी विकास अधिकारी प्रा. वसीम पटेल व संगीत समन्वयक प्रा.अक्षय दुसाने यांनी अथक परिश्रम घेत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## गरुड महाविद्यालय, शेंदुर्णी येथे ताण तणावमुक्त व कॉपीमुक्त कार्यशाळा संपन्न

शेंदुर्णी-अप्पासाहेब रघुनाथराव भाऊराव गरुड कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय शेंदुर्णी येथे ताण तणाव मुक्त वकॉपीमुक्त कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते . सदर कार्यशाळा ही विद्यापीठाच्या सूचना आणि मार्गदर्शना अंतर्गत आयोजित करण्यात आली होती. परीक्षेला सामोरे जात असताना विद्यार्थ्यांना ताण येऊ नये आणि आनंदानें त्यांनी परीक्षेला सामोरं जावं तसेच महाविद्यालयांमध्ये होणारे कॉपीचे प्रमाण कमी व्हावे हा या कार्यशाळे मागचा महत्त्वाचा उद्देश होता. महाविद्यालयात आयोजित या कार्यशाळेत मराठी विभाग प्रमुख परीक्षा समन्वयक डॉ.भूषण.ज्ञानदेव पाटील यानी विद्यार्थ्यांना पीपीटीच्या माध्यमातूनमार्गदर्शन केले.

वेळेचे योग्य नियोजन आणि अभ्यासातील सातत्य या गोष्टीकशा करता येतील? या स्वरूपातील हे सादरीकरण होते.त्याच पद्धतीने मानसिक दृष्ट्याविद्यार्थ्यांनीपरीक्षा कशी समजून घेतली पाहिजे या स्वरूपातील दुसरे प्रेझेंटेशन होते. विद्यार्थ्यांना परीक्षेला सामोरं जाताना हे व्याख्यान अधिक बळकट करणारे होते.सदर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य.प्रा.संजय भोळे, वाणिज्य विभाग प्रमुख प्रा.शाम साळुंखे,डॉ.अमर जावळे, डॉ.रोहिदास गवारे.हे उपस्थित होते.कार्यक्रमाचे आयोजन विद्यार्थी विकास विभागाच्या वतीने करण्यात आले होते.प्रास्ताविक विद्यार्थी, विकास अधिकारी डॉ. योगिता चौधरी यांनी तर आभार डॉ.ए.एन.जीवरग यांनी केले. कार्यक्रमाला.एकूण.११५ विद्यार्थी उपस्थित होते.




## उचंदे गावात भक्तिमय वातावरणात दररोज काकड आरती

मुक्ताईनगर -उचंदा येथील हनुमान मंदिरात दररोज भल्या पहाटे काकड आरतीचा भक्तिमय सोहळा पार पडत आहे.

गावातील पुरुष, महिला, ज्येष्ठ आणि बालमंडळी आनंदाने या काकड आरतीत सहभागी होत आहेत.

भाविकांच्या सहभागामुळे मंदिर परिसर भक्तिरसात न्हावुन निघत आहे, आणि गावात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले आहे. मुक्ताईनगर तालुक्यासह अन्य भागांतील असंख्य वारकरी व भाविकांसाठी उचंदा येथील हनुमान मंदिर हे श्रद्धास्थान आहे.

श्री संत मुक्ताबाईंच्या संत परंपरेला साजेशा स्वरूपात येथे कोजागिरी पौर्णिमेपासून ते त्रिपुरारी पौर्णिमा या कालावधीत दररोज पहाटे पाच वाजता काकड आरती होते. या सोहळ्यात गोपाळ महाराज... आंधळे पांगुळ, मुका, बहिरा, गौळणी, नाटाचे या महाराज देविदास

अभंग, विनवणीचे अभंग आणि पसायदानाने मंगलमय वातावरण तयार होते.

आरतीचा समारोप टाळ, मृदुंग आणि वीणेच्या गजरात होतो. सोहळ्याचे आयोजन करण्यामागे गावातील काही मान्यवरांचा मोलाचा सहभाग आहे. ह. भ. प. तुषार महाराज उचंदेकर, हर्षल , गोपाळ पाटील, गंगाराम पाटील, भगवान भोलाणे, गजमल पाटील, पाटील, गोकुळ भोलाणे, ह भ प पांडुरंग पाटील सोपान पवार, बजरंग टेन्ट हाऊस बाल वारकरी महाराज मंडळी.

संतांचे अभंग आळवीत भल्या पहाटे उठा जागे व्हारे आता स्मरण करा पंढरीनाथा ।। अभंगांनी समाजाला जागं करण्याचा, चैतन्य निर्माण करण्याचा उद्देश वास्तविक, साधला आषाढी एकादशीपासून ते अश्विन आहे.

## मतदान केंद्रावर पार्टी?; कर्मचाऱ्यांवर आता वेब कॅमेरे नजर ठेवणार

धुळे : प्रत्यक्ष मतदानाच्या एक दिवस अगोदर मतदान अधिकारी व कर्मचारी यांना निवडणूक आयोग मतदान केंद्रावर नियोजनासाठी पाठवत असते. बहुतेक मतदान केंद्रावर मनोरंजन म्हणून रात्रीच्या जेवनाला पार्टीचे स्वरूप आलेले असते. त्यातून कधीकधी मतदान केंद्रांवर कर्मचारी मद्य प्राशन करून गोंधळ घालत असल्याचे चित्र पण दिसून येते. परंतु आता प्रत्येक विधानसभा क्षेत्रातील एकूण मतदान केंद्रांपैकी ५० टक्के मतदान केंद्रांवर 'वेब कॅमेरे' कर्मचाऱ्यांच्या हालचाली व वर्तन टिपणार असल्याने पार्टी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना जरा सांभाळून राहावे लागणार आहे.

विधानसभा निवडणुकीसाठी येत्या २० नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान होणार आहे. त्यासाठी जिल्ह्यातील एकूण पाच विधानसभा क्षेत्रांमध्ये १७५२ मतदान केंद्रांवर मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्याकरिता मतदान कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत.त्यासंबंधी कर्मचाऱ्यांचे प्रथम प्रशिक्षण २५ ते २८ ऑक्टोबर या कालावधीत त्यांच्या कार्यरत विधानसभा क्षेत्रात झालेले आहेत. त्यानंतरचे प्रशिक्षण त्यांना ज्या विधानसभा क्षेत्रातील मतदान केंद्रांवर कार्य करायचे आहे त्या ठिकाणी घेण्यात येणार आहे.

त्यानंतर १९ नोव्हेंबर रोजी प्रत्यक्ष मतदान केंद्रावर पोहोचावे. रात्री मतदान केंद्रावर मुक्काम करावा लागतो. त्यामुळे काही कर्मचारी रात्री मतदान केंद्रावर मनोरंजनाच्या उद्देशाने रात्रीच्या जेवणात पार्टीचा आनंद घेत प्रत्यक्ष मतदान दिवसाच्या ४८ तास असतात. अगोदर ड्राय डे पाळला जातो.

हे लक्षात घेऊन काही कर्मचारी त्यांची व्यवस्था स्वतःच मतदान केंद्रावर येतानाच करीत असतात. यामुळे काही मतदान केंद्रांवर कर्मचाऱ्यांमध्ये आपसात वाद व दंगाधोपा होत असल्याच्या घटना बरेचदा घडतात. परंतु याकडे मतदान अधिकारी दुर्लक्ष करीत असतात.

परंतु याचा समाजात चुकीचा संदेश जातो. त्यामुळे यावेळी निवडणूक आयोग काही मतदान केंद्रावर वेब कॅमेरे लावणार असे सांगितले असून ते कॅमेरे कर्मचाऱ्यांच्या हालचाली व वर्तन टिपणार आहेत.

## दिवाळी: आंतरिक शांती, वैश्विक शहाणपण आणि सर्वांगीण कल्याण.... मंगला दिदी...

चोपडा प्रतिनिधी :- दिवाळी, दिव्यांचा सण, सणासाठी एक निमित्त आहे; यात सांस्कृतिक, आध्यात्मिक आणि वैज्ञानिक अर्थाचे गहन मिश्रण आहे. नूतनीकरण, मानसिक स्पष्टता आणि एकता यावर जोर देऊन, दिवाळीचे विधी-जसे की दिवे लावणे (तेल दिवे), घर साफ करणे - अनेक स्तरांवर कल्याणास प्रोत्साहन देतात....

या प्रथा प्राचीन शहाणपण आणि आधुनिक विज्ञान या दोहोंचाही प्रतिनिधित्व करतात, ज्यामुळे मन, शरीर आणि आत्मा यांचे पोषण करणारा दिवाळी उत्सव बनतो.चोपडा ओम शांती केंद्रात दिवाळीनिमित्त लक्ष्मीपूजन , पाडवा व भाऊबीज तीन दिवस भव्य - दिव्य कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

त्या प्रसंगी चोपडा केंद्राच्या संचालिका मंगला दिदी बोलत होत्या...

आनंद वाढवण्यासाठी, तणाव कमी करण्यासाठी आणि बंध मजबूत करण्यासाठी दिवाळी दरम्यान देणे, शेअर करणे आणि कृतज्ञता व्यक्त करण्याच्या पद्धती सकारात्मक मानसशास्त्रात दर्शविल्या जातात.



दिवाळी दरम्यान सामाजिक संबंध ऑक्सिटोसिनला चालना देतात - विश्वास आणि प्रेमाशी जोडलेले हार्मोन - एकटेपणा कमी करण्यास आणि जीवनातील समाधान वाढविण्यात मदत करते. आपल्या आधुनिक जगात, हे कनेक्शन मानसिक आरोग्यासाठी अधिकाधिक मौल्यवान आहेत.

घराची स्वच्छता केल्याने धूळ आणि ॲलर्जी कमी होते, श्वसन आरोग्यास फायदा होतो आणि स्वच्छतेला आनंदाशी जोडून मानसिक आरोग्यास हातभार लागतो. हा विधी स्वच्छतेच्या सवयींना बळकटी देतो ज्यामुळे सार्वजनिक आरोग्य सुधारते... सोबत मनाची देखील स्वच्छता करावी...

ओम शांति सेवा केंद्रात महालक्ष्मी पूजन , पाडवा आणि भाऊबीज कार्यक्रम मोठया उत्साहात साजरा करण्यात आला.

भाऊबीजेच्या दिवशी उपस्थित सर्व भावांना तिलक लावून सौगात म्हणून भेटवस्तू देण्यात आली तसेच आध्यात्मिक रहस्य व महत्त्व सांगण्यात आले .विविध क्रिएटिव खेळांद्वारे मनोरंजन करण्यात आले.

शेवटी ब्रह्मा भोजन देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. सदर कार्यक्रम प्रसंगी माजी आमदार कैलास बापू पाटील ,शिव इंडस्ट्रीजचे संचालक रवी पाटील, शिव केला एजन्सीचे संचालक राजू शर्मा , रमेश अग्रवाल यांसह ओम शांतीचे बंधू - भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वीतेसाठी मंगला दिदी, राज दिदी, सारिका दिदी, करिष्मा दिदी आदींनी परिश्रम घेतले....

शौर्य मराठी



# रणसंग्राम २०२४





गुरुवार दि. ७ नोव्हेंबर २०२४

## जळगाव शहरात सौ.जयश्री महाजनांचा 'हम सब एक है' चा नारा; मास्टर कॉलनीत जोरदार स्वागत

जळगाव (प्रतिनिधी)–विधानसभा निवडणुकीच्या रणधुमाळीत आता प्रचाराची रंगत वाढत चालली आहे. आज (दि.५) दुपारच्या प्रचार सत्रात महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार सौ.जयश्री सुनिल महाजन यांनी आपल्या प्रभाग क्रमांक १८ मधील प्रचाराचा दौऱ्याचा शुभारंभ संतोषी माता मंदिर येथे केला. त्यानंतर पुढे मास्टर कॉलनी भागात जयश्रीताई सुनील महाजन यांनी सर्व धर्मीय एकजूटता आणि जातीय सलोखा दाखवत 'हम सब एक है' चा नारा देत परिसरातील नागरिकांची मने जिंकली.

यावेळी आपल्या एकोप्याला तडा न जाऊ देता फक्त शहराचा विकास, तरुणांना रोजगार, महिलांची सुरक्षा आणि सर्वधर्मसमभाव या मुद्द्यांवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या मशाल चिन्हासमोर बटण दाबून यावेळी मतदान करा, अशी आर्त साद जयश्रीताईंनी उपस्थित नागरिकांना घातली. दरम्यान परिसरातील महिलांकडून ठिकठिकाणी त्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी महिलांशी संवाद साधत, ज्येष्ठांचे आशिर्वाद घेत त्यांनी परिसरातील नागरिकांची मने जिंकली.

यावेळी त्यांच्यासोबत महाविकास आघाडीचे किरण राजपूत, अशोक लाडवांजरी, मुकुंद सपकाळे, जयाताई तिवारी, गायत्रीताई सोनवणे, माजी नगरसेविका पार्वताबाई भिल्ल,



नीताताई सांगोडे, मनीषाताई पाटील, सुनील भाऊ माळी, किरण भावसार, प्रमोद नाईक, शाम तायडे, झाकीर शेख, डॉ सईद शाह, दानीश खान, एहफास खान, रज्जाक शाह, फिरोज मुलतानी आदींसह महाविकास आघाडीचे नेते, पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## वारंवार गैरहजर राहणाऱ्या चार कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल

पाचोरा –विधानसभा सार्वत्रिक निवडणुक २०२४ च्या अनुषंगाने १८ पाचोरा विधानसभा मतदार संघातील ३५५ मतदान केंद्रासाठी नियुक्त मतदान अधिकारी व कर्मचारी यांचे प्रथम सखोल प्रशिक्षण दि. २७ ऑक्टोबर २०२४ रोजी महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ (खत कारखाना), गिरड रोड पाचोरा व मतदान यंत्र हाताळणीबाबत प्रशिक्षण (हॅण्डसन) गो. से. हायस्कुल, पाचोरा येथे आयोजित करण्यात आले होते. सदरचे प्रशिक्षणबाबत मतदान प्रक्रियेसाठी मा. जिल्हा निवडणुक अधिकारी, जळगांव यांचेकडील आदेश क्रमांक ईले / ५२५/२०२४ दिनांक १९ ऑक्टोबर २०२४ चे आदेश नियुक्त केलेल्या कर्मचारी यांना त्यांचे कार्यालय, शाळा/महाविदयालये प्रमुखा मार्फत उपस्थित राहणे बाबत कळविण्यात आले होते. संदर्भ क्रं. २ नुसार आदेशात नियुक्ती ही लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५१ चे कलम १३४ मधील तरतुदी अन्वये व कलम २६ अन्वये प्राप्त अधिकारान्वये तसेच मा. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे आदेशान्वये झालेली असल्यामुळे नेमणूक आदेश रद्द करणेचे अथवा फेरबदल करणेचे कोणतेही निवेदन अथवा अर्ज स्विकारणेत येणार नाही व प्रशिक्षणास गैरहजर राहिल्यास मतदान कर्मचारी यांचे विरुध्द लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५१ चे कलम १३४ नुसार कारवाई करण्यात येईल.

## रोहिणी खडसे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणणार– रविंद्र भैय्या पाटील

बोदवड (प्रतिनिधी)-- मुक्ताईनगर विधानसभा मतदार संघाच्या महाविकास आघाडीच्या अधिकृत उमेदवार रोहिणी एकनाथराव खडसे यांना मोठ्या मताधिक्याने निवडून आणणार असे प्रतिपादन ज्येष्ठ नेते रवींद्र भैया पाटील यांनी प्रचारा दरम्यान केले.

बोदवड तालुक्यातील कुऱ्हा हरदो,मनुर खु, मनुर बु, शेवगा खु, धोनखेडा, लोणवाडी, शेलवड येथे प्रचार रॅली काढून मतदारांच्या भेटी घेऊन मतदारांशी संवाद साधुन विजयी करण्याचे आवाहनही जेष्ठ नेते रविंद्र भैय्यासाहेब पाटिल यांनी प्रचार दौऱ्यात केले.प्रत्येक गावात रोहिणी खडसे यांना मतदारांचा भरभरून प्रतिसाद लाभला महिलांनी औक्षण करून आणि ग्रामस्थांनी ढोल ताशांच्या गजरात आणि तुतारीच्या निनादात फुलांची उधळण करून रोहिणी खडसे आणि सहकाऱ्यांचे स्वागत केले यावेळी ग्रामस्थांशी संवाद साधताना रोहिणी खडसे म्हणाल्या विद्यमान लोकप्रतिनिधींनी गेल्या निवडणुकीत विविध आश्वासने देऊन मतदान मागितले परंतु पाच वर्षे सत्ता पक्षात राहूनही दिलेली आश्वासनांची पुर्ती करण्यात ते अपयशी ठरले. आ.एकनाथराव खडसे यांच्या माध्यमातून परिसरात अनेक विकास कामे झालीत भविष्यात रोहिणीताई खडसे यांच्या माध्यमातून विकास कामे केली जातील विकास कामे करण्यासाठी आम्ही सर्व कटिबद्ध आहोत. अपुर्ण सिंचन योजना पुर्ण करण्यासाठी आणि मतदारसंघाचा सर्वांगिण विकास करण्यासाठी तुतारी वाजवणारा माणुस या चिन्हां



समोरील बटण दाबून रोहिणी ताई खडसे यांना मतदानरुपी आशिर्वाद देण्याची विनंती करून रोहिणी ताई खडसे यांना मताधिक्य देऊन तालुक्यात मनुर परिसराची राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार साहेबांचा बालेकिल्ला म्हणुन असलेली ओळख कायम ठेवा असे रविंद्र पाटिल यांनी ग्रामस्थांना आवाहन केले.

## माझ्या विजयासह जनतेला सुगीचे दिवस येऊ द्या – प्रहार जनशक्तीचे अनिल चौधरी यांचे साई चरणी साकडे!

रावेर (प्रतिनिधी)–रावेर–यावलच्या जनतेला गुलामगिरीतून मुक्त होऊ द्या, माझ्या विजयाने मतदार संघाचा सर्वांगीण विकास होऊ द्या. जाती–पातीच्या भिंती गळून जनतेला सुख, शांती, समृद्धीचे दिवस येऊ द्या,माझ्या विजयासह जनतेला सुगीचे दिवस येऊ द्या असे साकडे रावेर–यावल विधानसभा मतदारसंघातील परिवर्तन महाशक्ती प्रहार जनशक्ती पक्षाचे अधिकृत उमेदवार अनिल छबिलदास चौधरी यांनी साईबाबांना घातले. रावेर–यावल विधानसभा मतदारसंघातील परिवर्तन महाशक्ती प्रहार जनशक्ती पक्षाचे अधिकृत उमेदवार अनिल छबिलदास चौधरी यांच्या प्रचाराचा शुभारंभ श्री तीर्थक्षेत्र



साईबाबा मंदिर वनोली ता. यावल येथे करण्यात आला.

मंदिराच्या पवित्र परिसरात, परिवर्तन महाशक्तीचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांची मोठी मांदियाळी जमली होती. माझ्या विजयासह जनतेला सुगीचे दिवस येऊ दे. परंपरागत कौटुंबिक वारसा दूर करून एक मजुराच्या मुलाच्या हातून जनतेची सेवा घडू दे असे साकडे अनिल चौधरी यांनी साईबाबांना घातले असून जनतेच्या आशीर्वादाने आणि सहकार्याने प्रचंड मताधिक्याने माझा विजय होणार असल्याचा विश्वास परिवर्तन महाशक्तीचे उमेदवार अनिल चौधरी यांनी व्यक्त केला.

याप्रसंगी फिरोज शेख, गणेश बोरसे, राम कुकडे, गोकुळ कोळी, कल्पेश खात्री खत्री, करीम मन्यार, भरत लिधुरे, विलास पांडे, बिलाल शेख, तुकाराम बारी, नंदकिशोर सोनवणे यांच्यासह अनेक जेष्ठ मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यकर्त्यांनी उत्साहात अनिल चौधरी यांचे जोरदार स्वागत केले.

## जिल्ह्यातील जनजागृतीसाठी चित्ररथाला निवडणूक अधिकाऱ्यांच्या हस्ते हिरवा झेंडा

जळगाव–विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठी २० नोव्हेंबर रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. जिल्ह्यात मतदारांमध्ये जनजागृती करण्यासोबतच अधिकाधिक मतदाराना मतदानासाठी प्रोत्साहित करण्याकरिता व्हॉईस ऑफ मीडिया यांच्या वतीने अमळनेर येथील मंगळग्रह संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने तयार करण्यात आलेल्या मतदार जनजागृती रथाचे उद्घाटन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी आयुष प्रसाद यांचे हस्ते दि. ५ नोव्हेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात करण्यात आले.



यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक महेश्वर रेड्डी, अपर जिल्हाधिकारी अंकुश पिनाटे, निवासी उपजिल्हाधिकारी भिमराज दराडे, जिल्हा पुरवठा अधिकारी संजय गायकवाड, जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील, मंगळ ग्रह संस्थानचे अध्यक्ष विश्वस्त आदी उपस्थित होते.

या वेळी उपस्थितांच्या हस्ते मतदार जनजागृती रथाचे उद्घाटन करण्यात आले.

जिल्ह्यात ३६ लाखापेक्षा अधिक मतदार संख्या आहे. लोकसंख्येच्या मानाने सार्वत्रिक निवडणूकांमध्ये होणारे मतदान पहाता कमी असते.

घटनेने प्रत्येक भारतीय नागरिकाला मतदानाचा अधिकार दिलेला असला तरी बहुतांश मतदार मतदान हक्क बजावण्यासाठी पुढे येत नाहीत. आपले मत बहुमूल्य असून मतदानाचा हक्क बजावावा.

## महायुती सरकारच्या मार्गदर्शनाखाली भविष्यात युवकांच्या रोजगारासाठी प्रयत्नशील:अमोल पाटील



पारोळा(प्रतिनिधी)- भविष्यात महायुती सरकारच्या मार्गदर्शनाखाली सुशिक्षित बेरोजगार युवकांना मोठ्या प्रमाणात रोजगार उपलब्ध व्हावा यासाठी मी प्रयत्नशिल असल्याचे एरंडोल मतदार संघाचे महायुतीचे उमेदवार अमोल पाटील यांनी प्रचारा दरम्यान सांगितले.पारोळा-एरंडोल विधानसभा मतदारसंघाचे महायुतीचे अधिकृत उमेदवार अमोल चिमणराव पाटील यांनी मंगळवारी एरंडोल तालुक्यात पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांच्या भेटी घेत संवाद साधला. यावेळी विविध गावात त्यांचे ढोल ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले.

गावोगावी जाऊन उमेदवार अमोल चिमणराव पाटील यांनी ज्येष्ठ नागरिकांचे शुभाशीर्वाद घेऊन आवाहन केले.

यावेळी नागरिकांनी अमोल पाटील यांच्या पाठीशी उभे राहून महायुतीला मतदान करणार असल्याची ग्वाही दिली. प्रसंगी अमोल पाटील यांनी पातरखेडा, जळू, नांदखुर्द बुद्रुक, नांदखुर्द, फरकांडे, जामफळ, उमरे, मालखेडा, आडगाव, कासोदा येथे प्रचार दौरा केला.मतदार संघातील विकास कामे अधिक चांगल्या पद्धतीने करण्यासाठी चांगले व्हिजन घेऊन महायुती सरकारच्या मार्गदर्शनाखाली भविष्यात प्रयत्न केले जातील अशी माहिती या वेळेला अमोल चिमणराव पाटील यांनी दिली. विविध गावांमध्ये ग्रामस्थांना नमस्कार करून भेटी- गाठी घेतल्या. पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी प्रचाराचे प्रभावी नियोजन केले.

# जामनेर मतदार संघात साधना महाजन सांभाळताय गिरीश महाजनांच्या प्रचाराची धुरा!





**मतदारसंघातील जनतेच्या विश्वासाच्या बळावर मी उमेदवारी दाखल केली आहे. आणि मला जनता निश्चितपणे विजयी करेल यात शंका नाही पक्षाने मला राज्यात इतर ठिकाणी प्रचाराची जबाबदारी दिल्याने मी ती देखील जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडत आहे. पत्नी सौ.साधना महाजन या पक्षीय जबाबदारी यशस्वीपणे सांभाळू शकत आहे, याचे नक्कीच समाधान आहे.**

**–गिरीश महाजन, भाजप उमेदवार, जामनेर.**

जामनेर(प्रतिनिधी)–भारतीय जनता पक्षाचे नेते तथा मंत्री गिरीश महाजन विधानसभा निवडणुकीसाठी पक्षीय नेत्यांच्या दौऱ्यांसह प्रचार यंत्रणांसाठी राज्यभरात व्यस्त झाले आहेत. त्यामुळे जामनेर मतदारसंघात त्यांच्या स्वतःच्या प्रचाराची धुरा त्यांच्या पत्नी व माजी नगराध्यक्षा साधना महाजन यांनी हाती घेतली आहे. उमेदवाराच्या पत्नीकडे प्रचाराची सर्वस्वी जबाबदारी असणारा जिल्ह्यातील ११ पैकी जामनेर हा एकमेव मतदारसंघ ठरला आहे.माघारीनंतर प्रचार जोर धरु लागला आहे. सर्वच उमेदवारांचे कुटुंबीय प्रचारात व्यस्त आहेत.

बहुतेक ठिकाणी उमेदवारांच्या लेकरांकडे नव्यापिढीला सांभाळण्याची तरघरातील महिलांकडे स्त्रीशक्तीशी संपर्काची जबाबदारी आहे.

मात्र ११ मतदारसंघातील प्रचाराचे एकंदरीत चित्र पाहिल्यानंतर जामनेर त्याला अपवाद ठरत असल्याचे दिसून येत आहे. खान्देशातील बहुतांश भाजपा उमेदवारांच्या अर्ज दाखल प्रक्रियेवेळी गिरीश महाजन यांनी उपस्थिती दिली होती. त्यांनी जळगाव, चाळीसगाव, रावेर, भुसावळ, जामनेरमध्ये जाऊन उमेदवारी अर्ज भरण्याची प्रक्रिया पूर्ण केली होती.माघारीनंतर त्यांच्याकडे पक्षाने राज्यभरातील समन्वयासह केंद्रीय नेत्यांच्या प्रचार सभांचे नियोजनाची जबाबदारी सोपविली आहे. तसेच भाजपाच्या यादीत महाजन यांचा स्टार प्रचारक म्हणून समावेश आहे. या जबाबदारीमुळे ते मतदारसंघाबाहेर व्यस्त झाले आहे. त्यामुळे त्यांच्या जामनेर मतदारसंघाची जबाबदारी त्यांच्या पत्नी साधना महाजन यांच्याकडे आहे.साधना महाजन सकाळी ७ वाजेपासूनच मतदारांच्या संपर्कासाठी घराबाहेर पडत आहेत.

गिरीश महाजन शेवटच्या टप्प्यात जामनेर मतदारसंघात दोन दिवस प्रचारासाठी येणार आहेत. तोपर्यंत संपूर्ण सुत्रे सौ.महाजन यांच्याकडेच असणार आहे.

## जळगाव जिल्ह्यात ठाकरे गटाला मोठा झटका

### एरंडोलची जागा शरद पवारांच्या राष्ट्रवादीला सुटल्यामुळे शिवसैनिक नाराज: पदाधिकाऱ्यांचे राजीनामे

एरंडोल (प्रतिनिधी)–राज्यातील विधानसभा निवडणुकीचे चित्र स्पष्ट झाल्यानंतर आता प्रचाराचा धुरळा उडला असताना जळगाव जिल्ह्यात ठाकरे गटाच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. महाविकास आघाडीच्या जागावाटपात एरंडोलची जागा शरद पवारांच्या राष्ट्रवादीला सुटल्यामुळे शिवसैनिक नाराज झाले असून जिल्हा परिषद सदस्यांसह ५० ते ६० पदाधिकाऱ्यांनी तडकाफडकी राजीनामे दिले आहेत.

एरंडोल मतदारसंघाची जागा शिवसेना ठाकरे गटांनी लढवली नाही. त्यामुळे नाराज असलेल्या कार्यकर्ते जिल्हा परिषद सदस्यांसह ५० ते ६० पदाधिकाऱ्यांनी सामूहिक राजीनामे दिले. अनेक वर्षांपासून



शिवसेना लढवत असलेली जागा शिवसेने न लढवता महाविकास आघाडीत राष्ट्रवादी शरद पवार गटाकडे गेल्यामुळे नाराज असलेल्या पदाधिकाऱ्यांनी राजीनामे दिला.

नानाभाऊ महाजन यांनी अपक्ष उमेदवारी अर्ज दाखल केला होता, मात्र माघार घेत त्यांनी कार्यकर्त्यांची चर्चा करत राजीनामे दिले आहेत. व्हॉट्सअपच्या माध्यमातून उद्धव ठाकरे तसेच संपर्कप्रमुख संजय सावंत यांना पदाधिकारी कार्यकर्त्यांनी राजीनामे पाठवले. अनेक वर्षांपासून या ठिकाणी रक्ताचे पाणी केलेय, शिवसेनेने निवडणूक लढवली. मात्र यावेळी शिवसेनेला ही जागा मिळाली नाही.

त्यामुळे राजीनामे देत असल्याची भावना पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केली आहे. राजीनामे दिल्यानंतर आता शिवसेना ठाकरे गटाचे पदाधिकारी कार्यकर्ते नेमकी काय भूमिका घेतात याकडे लक्ष लागले आहेत. मात्र शिवसेना ठाकरे गटाच्या राजीनामामुळे शिवसेना ठाकरे गटाच्या पदाधिकाऱ्यांच्या राजीनामामुळे महाविकास आघाडीत फूट पडली असून महाविकास आघाडीचे उमेदवाराला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.